तरुण भारत ■ सोमवार, ४ जुलै २०२२

# हळबे महाविद्यालयातर्फे निसर्ग भ्रमंती, वर्षा सहल

वार्ताहर
दोडामार्ग

कसईनाथ डोंगर हे दोडामार्गचे भूषण असून या डोंगरावर पुरातन काळातील मूर्ती आहेत. डोंगराच्या वरपर्यंत पाषाण असून, चहूबाजूने हिरवीगार दुर्मिळ औषधी वनस्पती आहे. त्यामुळे या डोंगराचा धार्मिक, सांस्कृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक, जैविक आणि पर्यटनाच्यादृष्टीने शास्त्रीय अभ्यास झाला पाहिजे, असे प्रतिपादन नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्टे यांनी केले.

लक्ष्मीबाई सीताराम हळबे महाविद्यालयातील भूगोल विभागाच्यावतीने या डोंगरावर निसर्ग भ्रमंती व वर्षा सहलीचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये संस्थेचे चेअरमन अभिजीत हेगशेट्टे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुभाष सावंत, भूगोल विभाग प्रमुख प्रा. डॉ. पी. डी. गाथाडे यांच्यासह प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी सहभागी झाले होते.

सकाळी साडेसहा वाजता आंबेली या छोट्या गावातून विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचारी चालत डोंगरावर पोहोचले असता. तेथे हेगशेट्टे यांनी कसईनाथ डोंगराबद्दल माहिती दिली. पृथ्वीच्या निर्मितीनंतर झालेल्या भौगोलिक प्रक्रियेत ज्वालामुखीद्वारे या डोंगराची निर्मिती झाली असून इथेवरपर्यंत काळे कातळ आढळून येते. हा त्याचा पुरावा आहे. या डोंगरावर वेगवेगळ्या प्रकारच्या अनेक दुर्मिळ औषधी वनस्पती, पक्षी व कीटकांच्या जाती आहेत. इथे ज्या दगडी मूर्ती आढळून येतात त्या कोणत्या कालखंडातील आहेत. ते शोधले पाहिजे. कारण इथल्या एका मूर्तीवर गोल सिंग असलेल्या मेंढ्याचे चित्र आहे. आज या परिसरात तसे मेंढे आढळत नाहीत. पण पूर्वीच्या काळी या परिसरात, असे मेंढे असले पाहिजेत. पण काळाच्या ओघात ते नष्ट झाले असावेत. या डोंगरावर प्रचंड जैवविविधता असून यातील अनेक वृक्ष उन्हाळ्यातील हिरवीगार असतात. त्यामुळे या डोंगरावर इतक्या उंचावरसुद्धा पाणी मिळू शकते. त्यामुळे या डोंगराचा सखोलपणे शास्त्रीय अभ्यास झाला पाहिजे, अशी गरज त्यांनी प्रतिपादन केली. यावेळी प्रा. डॉ. प्रज्ञा कुमार गाथाडे यांनीही डोंगराविषयीच्या अनेक दंतकथा विद्यार्थ्यांना सांगितल्या. या निसर्ग भ्रमंतीमध्ये प्राचार्य डॉ. सुभाष सावंत, प्रा. कौशिक शेट्टे, योगेश ठाकुर, कल्पेश गवस, आनंदा कांबळे यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



दोडामार्ग : कसईनाथ डोंगरावर भ्रमंतीसाठी गेलेले हळबे महाविद्यालयाचे विद्यार्थी व नवनिर्माण शिक्षण संस्थेचे चेअरमन अभिजित हेगशेट्टे. सोबत प्राध्यापक व अन्य.